आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२१ जानेवारी २०२५ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- स्वित्झर्लंडमधे दावोस इथं सुरु असलेल्या जागतिक आर्थिक मंचाच्या परिषदेत भारताच्या दालनाचं उद्घाटन, मुख्यमंत्र्यांच्या विविध उद्योजकांशी गाठीभेटी

- दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाच्या संकल्पपत्राचा दुसरा भाग जाहीर

- छत्तीसगढ आणि ओदिशात सुरक्षा दलांबरोबरच्या चकमकीत  नक्षलवाद्यांच्या केंद्रीय समितीचा सदस्य  चलपती याच्यासह १४ नक्षली ठार

- महिला क्रिकेटमधे १९ वर्षांखालच्या टी-ट्वेंटी आयसीसी विश्वचषक सामन्यात भारताची मलेशियावर मात

**आणि**

- ज्येष्ठ कीर्तनकार डॉक्टर किसन महाराज साखरे यांचं निधन

**<><><><><>**

स्वित्झर्लंडमधे दावोस इथं सुरु असलेल्या जागतिक आर्थिक मंचाच्या परिषदेत भारताच्या दालनाचं उद्घाटन आज झालं. अन्न प्रक्रिया उद्योग मंत्री चिराग पासवान, कौशल्य विकास आणि उद्योजकता राज्यमंत्री जयंत चौधरी यांनी संयुक्तपणे या दालनाचं उद्घाटन केलं. त्यानंतर पासवान यांनी कोका कोला चे मुख्य कार्यकारी अधिकारी हेनरिक ब्रॉन यांची भेट घेऊन, अन्न प्रक्रिया उद्योगाला अधिक सक्षम करण्यासह यामध्ये उत्कृष्ट पद्धतींचा अवलंब करण्यावर चर्चा केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यावेळी उपस्थित होते.

या परिषदेतल्या महाराष्ट्राच्या दालनाचं उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल केलं. यावेळी उद्योग मंत्री उदय सामंत यांच्यासह विविध राज्यांचे आणि

केंद्रीय मंत्री उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस आज विविध कंपन्यांच्या उच्च पदस्थ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेणार आहेत, तसंच अनेक सामंजस्य करार करणार आहेत. जागतिक आर्थिक मंचाच्या स्वागत समारंभाला ते आज उपस्थित राहणार आहेत. त्याआधी मुख्यमंत्र्यांनी जागतिक आर्थिक मंचाचे संस्थापक क्लॉस श्वाब आणि होरॅसिसचे अध्यक्ष फ्रँक जर्गन रिक्टर यांची भेट घेतली. मुंबईत होरॅसिसचं मुख्यालय आणण्याबाबत यावेळी मुख्यमंत्र्यांनी रिक्टर यांच्याशी चर्चा केली.

**<><><><>**

विधिमंडळांची कार्यक्षमता आणि उत्तरदायित्व वाढवण्यासाठी त्यांचे सदस्य वचनबद्ध असल्याचं मत लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी आज व्यक्त केलं. पाटणा इथं  अध्यक्षतेखाली आयोजित ८५ व्या अखिल भारतीय पीठासीन अधिकारी परिषदेचा आज समारोप झाला. समारोपाच्या भाषणात बिर्ला बोलत होते. ही परिषद फलदायी ठरली असून नव्या तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर सहभागींनी सहमती दर्शवल्याचं त्यांनी सांगितलं. भारताची राज्यघटना पुरेशी लवचिक असून त्यामुळे आपल्या संसदीय लोकशाहीने संकटांचा सामना यशस्वीपणे केला आहे, असं मत विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी व्यक्त केलं. “भारतीय राज्यघटनेची ७५ वर्षे : घटनात्मक मूल्यांच्या बळकटीकरणासाठी संसद आणि राज्य विधान मंडळे यांचे योगदान” या विषयावर ते काल बोलत होते.

**<><><><>**

नवी दिल्लीच्या राष्ट्रपती भवनातलं अमृत उद्यान येत्या २ फेब्रुवारीपासून सर्वांसाठी खुलं होणार आहे. येत्या ३० मार्चपर्यंत आठवड्याचे ६ दिवस सकाळी १० ते संध्याकाळी ६ या वेळात कोणालाही या उद्यानाची शोभा पाहता येईल. राष्ट्रपती भवनाच्या संकेतस्थळावर त्याच्या विनामूल्य प्रवेशिका उपलब्ध आहेत.

देशाच्या समृद्ध परंपरेचं दर्शन घडवणारा विविधता का अमृत महोत्सव येत्या ६ मार्चपासून अमृत उद्यानात साजरा करण्यात येणार आहे.

**<><><><><>**

दिल्ली विधानसभा निवडणुकीत ७० जागांसाठी ६ हजार ९९ उमेदवार रिंगणात आहेत. नवी दिल्ली विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक म्हणजे २३ उमेदवार असून पटेल नगर आणि कस्तुरबा नगर मतदारसंघात सर्वात कमी म्हणजेच प्रत्येकी पाच उमेदवार रिंगणात आहेत. मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, १ हजार ५२२ अर्जांपैकी ४८७ अर्ज फेटाळण्यात आले आहेत. पुढच्या महिन्याच्या ५ तारखेला मतदान होणार असून ८ तारखेला मतमोजणी होणार आहे.

दरम्यान या निवडणुकीसाठी भाजपाच्या संकल्प पत्राचा दुसरा भाग भाजपा नेते अनुराग ठाकूर यांनी आज जाहीर केला. या संकल्पपत्रात दिल्लीतल्या तरुणांना स्पर्धा परीक्षांसाठी १५ हजार रुपयांची मदत, तसंच दोन वेळचा प्रवास आणि अर्ज शुल्काची परतफेड, गरजू विद्यार्थ्यांना शिशुवर्गापासून पदव्युत्तर पदवीपर्यंतचं मोफत शिक्षण, तांत्रिक आणि व्यावसायिक अभ्यासक्रमातल्या अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांना दरमहा एक हजार रुपये विद्यावेतन, त्याशिवाय १० लाखांचा आयुर्विमा, अपघात विमा आणि रिक्षा-टॅक्सी चालकांसाठी ५ लाख रुपयांचा वाहन विमा इत्यादी आश्वासनं संकल्प पत्रात देण्यात आली आहेत.

**<><><><><>**

केंद्रीय आदिवासी विकास मंत्रालयाच्या वतीने नवी दिल्लीत भारत मंडपम इथं प्रधानमंत्री जनमन परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे. केंद्रीय आदिवासी विकास मंत्री जुएल ओराम आणि राज्यमंत्री दुर्गादास उईके हे या परिषदेला उपस्थित राहणार आहेत. प्रधानमंत्री जनमन अभियानाचा उद्देश शेवटच्या

घटकापर्यंत विकास पोहोचवणं हा असून, एकंदर सहा क्षेत्रांवर भर देण्यात आला आहे. या परिषदेत देशातल्या १८ राज्यातले ८८ आदिवासी बहुल जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी चर्चेत भाग घेणार असून, अजूनही विकासापासून वंचित राहिलेल्या मागास जिल्ह्यांच्या विकासासाठी एक कृती आराखडा तयार केला जाणार आहे.

**<><><><>**

नेत्रदानातून अनेक दृष्टिहीनांना नवी दृष्टी मिळू शकते, त्यामुळे अधिकाधिक जणांनी नेत्रदानाचा संकल्प करावा, असं आवाहन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केलं आहे. नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड- नॅब या संस्थेच्या ७४ व्या स्थापना दिनानिमित्त ते काल बोलत होते. या संस्थेच्या स्थापनेत क्रिकेटपटू विजय मर्चंट यांचं योगदान असल्याचं समजल्यानंतर त्यांच्याबद्दलचा आदर शतपटींनी वाढल्याची भावना राज्यपालांनी व्यक्त केली. ही संस्था छापखाना, बोलकी पुस्तकं, प्रशिक्षणं अशा उपक्रमांद्वारे अंध, तसंच दृष्टिबाधितांना आशा आणि सक्षमीकरणाची हमी देणारी आहे, असंही त्यांनी नमूद केलं. विविध पुरस्कारांचं वितरणही राज्यपालांच्या हस्ते यावेळी झालं.

**<><><><>**

मराठी भाषेतल्या साहित्यनिर्मितीबद्दल राज्य शासनाच्या वतीनं दिल्या जाणाऱ्या यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कारांसाठी २०२४ या वर्षाकरता अर्ज मागवण्यात आले आहेत. १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत प्रकाशित झालेली प्रथम आवृत्ती पुस्तकं या स्पर्धेसाठी पात्र आहेत. मुंबईच्या रवींद्र नाट्यमंदिरात येत्या ३१ जानेवारीपर्यंत महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडे पुस्तकं पाठवावीत, असं आवाहन मंडळाच्या सचिवांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केलं आहे.

**<><><><>**

छत्तीसगडमधल्या गरियाबंद जिल्ह्यात आणि ओदिशामधल्या नुआपाडा जिल्ह्यात सुरक्षा दलाच्या कारवाईत १४ नक्षलवादी मारले गेले. त्यात नक्षलवाद्यांच्या केंद्रीय समितीचा सदस्य जयराम उर्फ चलपती याचाही समावेश आहे. त्याच्यावर १ कोटी रुपयांचं बक्षीस होतं. या कारवाईत ठार झालेल्या दोन महिला नक्षलवाद्यांचे मृतदेह काल,  तर १२ नक्षलवाद्यांचे मृतदेह आज ताब्यात घेण्यात आले. सुरक्षा दलाने घटनास्थळावरून एका रायफलसह मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा जप्त केला आहे. पोलीस आज या परिसरात व्यापक शोधमोहीम राबवत आहेत. नक्षलमुक्त भारत अभियानाच्या दृष्टीने सुरक्षा दलाचं हे मोठं यश असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. नक्षलवाद आपल्या शेवटच्या घटका मोजत आहे, असं शहा म्हणाले.

**<><><><><>**

जातवैधता प्रमाणपत्र सादर न केल्यानं बीड जिल्ह्यातील १३ सरपंच आणि ४१८ सदस्यांचं सदस्यत्व रद्द करण्याचा निर्णय जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती प्रवर्गासाठीच्या राखीव जागांवरून निवडून आलेल्या सदस्यांना बारा महिन्यांच्या आत जातवैधता प्रमाणपत्र सादर करणं आवश्यक असतं. पण बीड जिल्ह्यातल्या आष्टी, अंबाजोगाई, वडवणी, पाटोदा, माजलगाव, केज आणि धारूर तालुक्यातल्या १३ सरपंच आणि ४१८ सदस्यांनी प्रमाणपत्र सादर केलं नाही. त्यामुळे त्यांचं सदस्यत्व रद्द करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमधे १९ वर्षांखालच्या टी ट्वेंटी आयसीसी विश्वचषक स्पर्धेत भारतानं अ गटातल्या सामन्यात आज यजमान मलेशियाचा १० गडी राखून दणदणीत पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजीसाठी क्वालालंपूरच्या मैदानात उतरलेल्या मलेशियाला फक्त ३१ धावांपर्यंत मजल मारता आली. भारताच्या

वैष्णवी शर्मानं ५ तर आयुषी शुक्लानं ३ गडी बाद केले. भारतानं विजयासाठी असलेलं ३२ धावांचं लक्ष्य दोन षटकं आणि पाच चेंडूतच पूर्ण केलं.

**<><><><><>**

ज्येष्ठ कीर्तनकार डॉक्टर किसन महाराज साखरे यांचं काल रात्री पुण्यात निधन झालं. ते ८९ वर्षांचे होते. आज दुपारी आळंदी इथं त्यांच्यावर अन्त्यसंस्कार करण्यात येणार आहेत. साखरे महाराज यांचा शिष्य परिवार देशात, तसंच परदेशातही आहे. राज्य सरकारनं २०१८ या वर्षीचा ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित केलं होतं.

किसन महाराज साखरे यांच्या निधनाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दुःख व्यक्त केलं आहे. साखरे यांची कार्यसाधना पुढच्या अनेक पिढ्यांसाठी तेजोमय राहील, अशा शब्दात फडणवीस यांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला आहे. तर साखरे महाराज यांच्या निधनानं अध्यात्मिक क्षेत्रातला ज्ञानतारा निखळला आहे, असं पवार यांनी आदरांजली व्यक्त करताना म्हटलं आहे.

**//<><><><><>//**